# सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची तिसरी सभा शुक्रवार दि.३/२/०६ रोजी सकाळी ९-०० वा.** विद्यापीठाच्या मुख्य कार्यालयात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. डॉ. इरेश स्वामी - कुलगुरु. | अध्यक्ष | उपस्थित. |
| २) | श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे. | सदस्य | उपस्थित. |
| ३) | श्री. रामदास पी. सब्बन. | सदस्य | उपस्थित. |
| ४) | मा. प्रधान सचिव, उच्च शिक्षण, मुंबई. | सदस्य | अनुपस्थित. |
| ५) | मा. सचिव, तंत्र शिक्षण, मुंबई | सदस्य | अनुपस्थित. |
| ६) | मा. संचालक (उ.शि.) यांचे प्रतिनिधी मा. सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर. | सदस्य | अनुपस्थित. |
| ७) | डॉ. एल. पी. देशमुख. | सदस्य | उपस्थित. |
| ८) | संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ - पदसिध्द. | सदस्य | उपस्थित. |
| ९) | प्राचार्य जे. के. बिले. | सदस्य | उपस्थित. |
| १०) | प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर. | सदस्य | उपस्थित. |
| ११) | डॉ. मोरे पी. जी. | सदस्य | उपस्थित. |
| १२) | श्री. एन. बी. पवार. | सदस्य | उपस्थित. |
| १३) | श्रीमती एन. व्ही. साठे. | सदस्य | उपस्थित. |
| १४) | श्री. पी. एम. हिरेमठ. | सदस्य | उपस्थित. |
| १५) | श्री. व्ही. तिरुपती. | सदस्य | उपस्थित. |
| १६) | प्राचार्य बी. पी. रोंगे. | सदस्य | उपस्थित. |
| १७) | डॉ. डी. डी. रणनवरे. | सदस्य | उपस्थित. |
| १८) | श्री. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील. | सदस्य | अनुपस्थित. |
| १९) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम. | सदस्य | उपस्थित. |
| २०) | वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित | उपस्थित. |
| २१) | परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित | उपस्थित. |
| २२) | डॉ. पी. बी. कुंभार - कुलसचिव | सचिव | उपस्थित. |

सभेच्या सुरुवातीला मा.कुलगुरु यांनी सकाळी १०-३० वाजता महामहिम राज्यपाल मा. श्री. एस. एम. कृष्णा यांच्या शुभहस्ते, मा.ना. विजयसिंहजी मोहिते-पाटील ग्रामविकास व पर्यटन मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री सोलापूर जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्र. अध्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मा. प्रा. राजशेखरन् पिल्लै यांच्या प्रमुख उपस्थितीत मुलींच्या वसतिगृह बांधकाम कोनशिला अनावरण होईल त्यानंतर एन. सी. सी. चे विद्यार्थी महामहिम राज्यपाल यांना मानवंदना देतील आणि नंतर सकाळी ११-०० वाजता विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ सुरु होईल अशी माहिती दिली.

**[कृ.मा.प.]**

सभेतील विषयांवर खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

विषय क्र. [ १ ] दि. २७ डिसेंबर २००५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्र. [ १ ] दि. २७ डिसेंबर २००५ रोजी दुपारी १-०० वा. झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतामध्ये सदस्यांकडून खालील दुरुस्त्या सुचविण्यात आल्या व त्यानंतर खालील दुरुस्तीसह कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.

१) पान क्र. ३ वरील सदस्यांच्या उपस्थिती यादीमधील क्र. २० मध्ये "डॉ. आर. आर. येळीकर "यांच्या नांवाऐवजी वित्त व लेखा अधिकारी व क्र. २१ मध्ये "डॉ. एम. एस. शेजूळ "यांच्या नांवाऐवजी परीक्षा नियंत्रक तसेच "निमंत्रित सदस्य "याऐवजी स्थायी निमंत्रित अशी दुरुस्ती डॉ. पी. जी. मोरे यांनी सुचविली. ती व्यवस्थापन परिषदेने मान्य केली.

२) पान क्र. ९ वरील विषय क्र. १३ मधील विषयाच्या विश्लेषणामध्ये ओळ क्र. ६ मधील "पदान" ही टंकलेखनाची राहून गेलेली त्रुटी असल्याने "पदान" ऐवजी "प्रदान" असा शब्द दुरुस्त करावा असे डॉ. एल. पी. देशमुख यांनी सुचविले. त्यानुसार दुरुस्ती मान्य करण्यात आली.

३) पान क्र. १० वरील ठराव क्र. १५ मध्ये "महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेल्या शिफारशींचा विचार करुन शिफारशी <u>दुरुस्तीसह</u> मान्य कराव्यात असे ठरले." त्यानुसार दुरुस्ती करण्यात आली.

४) पान क्र. १६ वरील ठराव क्र. २७ मध्ये "बांधकाम मंजूरीबाबत प्रशासनाने पाठपुरावा करावा असे सुचविले.

५) पान क्र. २१ वरील ठराव क्र. ३३ मध्ये डॉ. एम. एस. शेजूळ परीक्षा नियंत्रक या पदावर दि. १०/१/२००५ रोजी तर डॉ. आर. आर. येळीकर वित्त व लेखा अधिकारी या पदावर दि.८/७/२००५ रोजी हजर झाले आहेत अशी दुरुस्ती करावी असे ठरले.

[कृ.मा.प. ]

**विषय क्र. [ २ ] दिनांक 3 फेब्रुवारी 2006 रोजी होणाऱ्या दीक्षांत समारंभात पदव्या, पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत.**

(टिपणी : महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 1994 अंतर्गत कलम 96(1) नुसार पदव्या, पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"The Management Council may institute and confer such Degrees/Diplomas Certificates and other academic distinctions as may be recommended by the Academic Council."

या तरतूदीनुसार विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस अशा पदव्या, पदविका प्रमाणपत्रे देण्याबाबत शिफारस करावयाची असते. जे स्नातक पदव्या, पदविका प्रमाणपत्रे घेऊ इच्छितात अशा स्नातकांची यादी सोबत जोडली आहे. दिनांक 23 जानेवारी 2006 रोजी विद्यापरिषदेच्या झालेल्या सभेत विषय क्र. 11 वरील झालेला ठराव खालीलप्रमाणे आहे.

> ठराव :"ही विद्यापरिषद व्यवस्थापन परिषदेस अशी शिफारस करते की, पात्र स्नातकांना पदव्या/पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्यास अनुमती द्यावी."

सदरची शिफारस मान्यतेसाठी सादर)

**ठराव क्र. [ २ ] पात्र स्नातकांना पदव्या/पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात यावी असे ठरले.**

आयत्या वेळेच्या विषयामध्ये दीक्षांत समारंभासाठी गठन केलेल्या स्टीअरींग कमिटीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.

मा. अध्यक्ष यांच्या वतीने सचिव यांनी सर्व सदस्यांचे आभार मानले व मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

सही/-
**डॉ. आय. एस. स्वामी**
**अध्यक्ष.**